सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ८ एप्रिल २०२६

आतील पानावर

पान २– 'आखरी सवाल' मध्ये संजूबाबा वेगळ्या भूमिकेत!
पान ३– 'कॉकटेल २'मध्ये कृतिचा ग्लॅमरस यू – टर्न
पान ४– कथानारचा बहुप्रतिक्षित ट्रेलर अखेर प्रदर्शित
पान ५– सोनालीने सांगितले फिटनेसचे रहस्य
पान ७–'मातृभूमी'च्या रिलीजआधी सलमानची घोषणा




# 'क्वीन २'मधून कंगनाची ग्रँड एंट्री



बॉलिवूड अभिनेत्री आणि खासदार कंगना रनौत पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या गाजलेल्या 'क्वीन' या चित्रपटाच्या सिक्वेलबद्दल सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. 'क्वीन २' या चित्रपटातून कंगना पुनरागमन करणार असल्याने तिचे चाहते खूपच उत्सुक झाले आहेत. 'क्वीन २'ची शूटिंग एप्रिलच्या शेवटी सुरू होण्याची शक्यता आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन पुन्हा एकदा विकास बहल करणार आहेत. पहिल्या भागाने प्रेक्षकांच्या मनात खास स्थान निर्माण केले होते. एका साध्या, भोळ्या मुलीच्या आयुष्यातील बदल आणि तिचा आत्मशोध याची कथा लोकांना खूप भावली होती. 'क्वीन २'मध्ये मात्र कंगनाचा अंदाज पूर्णपणे वेगळा असणार आहे. या वेळी ती एका मॉडर्न, शहरी मुलीच्या भूमिकेत दिसणार आहे.

आत्मविश्वासपूर्ण, स्वतंत्र आणि स्मार्ट असा तिचा स्वभाव असेल. जरी पात्र बदलले असले, तरी कथेमध्ये आत्मशोधाचा धागा कायम ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांना पुन्हा एकदा भावनिक प्रवास अनुभवायला मिळणार आहे. पहिल्या 'क्वीन' चित्रपटात परदेशातील लोकेशन्स दाखवण्यात आले होते. मात्र 'क्वीन २'ची कथा भारतातच घडणार आहे. मुंबईसह देशातील विविध शहरांमध्ये या चित्रपटाचे शूटिंग होणार आहे. सध्या मुंबईमध्ये पहिल्या टप्प्याचे शूटिंग करण्याची तयारी सुरू आहे. त्यानंतर इतर मेट्रो शहरांमध्येही चित्रपटाचे चित्रीकरण होणार आहे. कलाकारांच्या बाबतीतही या वेळी बदल पाहायला मिळणार आहे. पहिल्या भागात राजकुमार राव महत्त्वाच्या भूमिकेत होते, पण 'क्वीन २'मध्ये सपोर्टिंग कास्ट पूर्णपणे नवीन असण्याची शक्यता आहे. चित्रपटाला फ्रेश लूक देण्यासाठी नव्या चेहऱ्याना संधी देण्याचा विचार निर्मात्यांचा आहे. कंगना रनौतची मागील 'इमरजेंसी' ही फिल्म २०२५ मध्ये प्रदर्शित झाली होती. त्यानंतर ती फारशी चित्रपटांमध्ये दिसली नाही. त्यामुळे 'क्वीन २'मधून ती जोरदार कमबॅक करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. 'क्वीन' या चित्रपटाने कंगनाच्या करिअरला मोठी उंची दिली होती. त्यामुळे 'क्वीन २'कडून प्रेक्षकांच्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत. जर या चित्रपटात दमदार कथा, उत्कृष्ट अभिनय आणि भावनिक टच असेल, तर कंगना पुन्हा एकदा बॉक्स ऑफिसवर आपली छाप सोडू शकते. एकूणच, 'क्वीन २' हा चित्रपट आत्मशोध, स्वातंत्र्य आणि आत्मविश्वास यांची नवी कहाणी घेऊन येणार आहे. त्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक खास अनुभव ठरणार आहे.




## अरुणा इराणी- फरिदा भेटल्या २९ वर्षांनंतर

बॉलिवूडमध्ये ६० -७० चं दशक गाजवणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे फरिदा जलाल आणि अरुणा ईराणी. उत्तम अभिनय कौशल्य आणि साधेपणा यांच्या जोरावर या दोघींनीही तो काळ गाजवला. विशेष म्हणजे एकाच क्षेत्रात काम करुनदेखील जवळपास २९ वर्ष या दोघींची एकमेकींशी भेट झाली नव्हती. 'इंडियन आयडॉल'च्या सेटवर या दोघींनी या गोष्टीचा खुलासा केला. या कार्यक्रमाच्या सेटवर फरिदा जलाल यांच्या 'तकदीर' या सिनेमातील काही फोटो दाखवण्यात आले. या जुन्या आठवणी पाहून त्यांच्या डोळ्यात पाणी तरळलं. विशेष म्हणजे या सेटवर दोन्ही अभिनेत्री बऱ्याच वर्षांनंतर एकत्र आल्यामुळे अरुणा इराणीदेखील थोड्या भावूक झाल्या. फरिदा आणि अरुणा यांनी 'बॉबी' सिनेमात एकत्र स्क्रीन शेअर केली होती. या सिनेमानंतर त्यांच्या भेटीगाठी कमी झाल्या. या दोघींनी अनेक सिनेमांमध्ये सहाय्यक अभिनेत्रीची भूमिका साकारली होती. विशेष म्हणजे दोघींच्याही वाट्याला येणाऱ्याभूमिका या जवळपास सारख्याच असायच्या. त्यामुळे सिनेमांमध्ये एकतर फरिदाला घ्यायचे किंवा मग अरुणाला. त्यामुळे दोघीही एकाच सिनेमात झळकणं फार कठीण होतं. परिणामी, या दोघींनी एकत्र सिनेमा फार कमी केले. दरम्यान, २९ वर्षांनंतर या दोघींनी 'ओ रोमियो' या सिनेमात एकत्र काम केलं. त्यापूर्वी त्या एकाही सिनेमात एकत्र झळकल्या नव्हत्या.

## दिव्यासाठी 'तो' सिनेमा ठरला गेमचेंजर!

‘द बॉलिवूडमध्ये आता मुख्य कलाकाराचीच हवा असा काळ राहिलेला नाही. जितके महत्व मुख्य कलाकाराला आहे तितकेच सहाय्यक कलाकाराही आहे. पण यागोदर सहाय्यक कलाकारापेक्षा मुख्य कलाकार चर्चेत असायचे. त्यामुळे सहाय्यक कलारांना मोठ्या संघर्षाचा सामना करावा लागायचा. बॉलिवूडमध्ये काम करत असलेली अभिनेत्री दिव्या दत्ताने सहाय्यक कलाकार म्हणून तिच्या विविध भूमिकेंमधून वेगवेगळ्या छटा समोर आणल्या आहेत. तिने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. याविषयी सांगताना कोणत्या सिनेमाने तिच्या करिअरला कलाटणी मिळवून दिली. याबाबत तिने सांगितले आहे. त्या एका सिनेमामुळे तिला तब्बल २० सिनेमांसाठी कास्ट करण्यात आल्याचा खुलासा अभिनेत्रीने केला आहे. ‘वीर झरा’ या सिनेमात काम केल्यानंतर अभिनेत्रीने एकाचवेळी २० सिनेमे साईन केले. दिव्या दत्ताने वयाच्या १६ व्या वर्षी ‘इश्क में जीना इश्क में मरना’ या सिनेमातून मोठ्या पडद्यावर एन्ट्री केली. या सिनेमानंतर, १९९९ च्या ‘शहीद-ए-मोहब्बत बूटा सिंग’ या पंजाबी सिनेमाने तिला लोकप्रियता मिळवून दिली. पण त्यानंतरही तिला अनेक वर्ष संघर्ष करावा लागला. याच काळात तिला ‘वीर-झारा’ सिनेमात कास्ट करण्यात आले आणि त्यानंतर दिव्याने कधी मागे वळून पाहिलेच नाही. एका मुलाखतीत दिव्याने स्पष्ट केले की, साधारण २००७ साली तिला इतक्या सिनेमांच्या ऑफर्स आल्या होत्या की तिने एकाच वेळी जवळपास २० चित्रपट साइन केले होते. दिव्या म्हणते, मला आठवतंय, मी जवळपास २० चित्रपट स्वीकारले होते, कारण एक काळ असा होता की माझ्याकडे एकही चित्रपट नव्हता. अचानक मला इतक्या ऑफर्स आल्या की



मी त्या सगळ्या स्वीकारल्या. हा माझा निर्णय होता. यात खूप काही पणाला लागले होते. पण मी परत गेले आणि ज्या सिनेमांचे चित्रीकरण मी सुरूही केले नव्हते, त्यासाठी मिळालेली साइनिंग अमाऊंट परत केली. तेव्हापासून, मी फक्त तेच काम केले ज्याचा मला आनंद वाटला. अभिनेत्री दिव्या दत्ताला २०१७ मध्ये ‘इरादा’ सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. ती ‘भाग मिल्खा भाग’, ‘बदलापूर’ आणि ‘छावा’ यांसारख्या व्यावसायिक सिनेमांमध्ये दिसली. अलीकडेच अभिनेत्री ‘चिरैया’ या वेबसिरीजमध्ये तिने साकारलेल्या वेगळ्या भूमिकेमुळे चर्चेत आहे.

## ‘आखरी सवाल’ मध्ये संजूबाबा वेगळ्या भूमिकेत!

गेल्या काही दिवसांपूर्वी अभिनेता संजय दत्त याला मोठ्या प्रमाणावर ट्रोल करण्यात आले होते. त्याचं कारण होतं त्याने साऊथच्या एका सिनेमातील अभिनेत्री नोरा फतेहीसोबत केलेला डान्स. ‘केडी: द डेविल या सिनेमातील सरक सरके चुनर तेरी सरके या गाण्यामुळे वाद निर्माण झाला होता. त्यानंतर हे गाणे यू ट्यूबवरुन हटवण्यात आले. आता संजय दत्त पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, त्याच्या आगमी आखरी सवाल या सिनेमामुळे. या सिनेमाचा टीझर हनुमान जयंतीच्या निमित्ताने रिलीज करण्यात आला.

गेल्या अनेक दिवसांपासून संजय दत्त एका वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची चर्चा होती. अखेर आखरी सवाल सिनेमातून संजय दत्त एका दमदार भूमिकेतून चाहत्यांच्या भेटीला आला आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते सिनेमा निर्माते अभिजीत मोहन वरांग यांनी या सिनेमाचे दिग्दर्शन केले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर लादलेल्या बंदीपासून ते बाबरी मशिदीच्या विध्वंसासंदर्भातील आरोपांपर्यंत ‘आखिरी सवाल’ सिनेमात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले जातात. ज्यांची उत्तरे लोक बर्याच काळापासून शोधत आहेत. धाडसी आणि निर्भीड असलेला हा टीझर इतिहासात खोलवर शिरतो आणि एक अशी कथा सादर करतो, जी देशभरात एका नव्या चर्चेला सुरुवात करेल. हा सिनेमा ८ मे या दिवशी देशभरातील सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या सिनेमात संजय दत्तसोबत अमित साध, नमाशी चक्रवर्ती, समीरा रेड्डी, नीतू चंद्रा आणि त्रिधा चौधरी यांसारखे कलाकार आहेत. संजय दत्तची वेगळी भूमिका असलेल्या या सिनेमाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते. या सिनेमाचा टीझर कथानकाची एक प्रभावी झलक दाखवतो. आखरी सवाल सिनेमाची कथा विकी नावाच्या एका हुशार पण काहीशा तापट स्वभावाच्या तरुणाभोवती फिरते. आपला प्रबंध नाकारल्यानंतर विकी आपले मार्गदर्शक, प्राध्यापक गोपाल नाडकर्णी यांच्यावर पक्षपाताचा आरोप करतो. सुरुवातीला एक वैयक्तिक शैक्षणिक वाद म्हणून सुरू झालेला हा प्रकार पुढे जाऊन राष्ट्रीय पातळीपर्यंत चर्चेचा विषय बनतो. हा सिनेमा तरुणांच्या मनातील ज्वलंत प्रश्न आणि ऐतिहासिक घटना व तथ्यांच्या आधारे सत्याचा शोध घेण्याची त्यांची धडपड चित्रित करतो. त्यामुळे आखरी सवाल पाहण्यासाठी चाहत्यांची उत्सुकात शिगेला पोहचली आहे.



# 'राजा शिवाजी'चा टीझर पाहून विवेक ओबेरॉय भारावला

बॉलिवूडचा रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' सिनेमा येत्या १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाच्या माध्यमातून सर्वांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेचा भव्य आणि प्रेरणादायी अनुभव घेता येईल. 'राजा शिवाजी' सिनेमाची पहिली झलक थिएटरमध्ये 'धुरंधर २'च्या स्क्रीनिंगदरम्यान प्रदर्शित करण्यात आली होती. आता रितेशने सगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर या सिनेमाचा टीझर शेअर केला आहे. 'राजा शिवाजी' सिनेमाची पहिली झलक समोर येताच सर्वांनी यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. या चित्रपटात दिग्गज कलाकारांची मांदियाळी पाहायला मिळाली. टीझर प्रदर्शित झाल्यावर अनेक बॉलीवूड कलाकारांनी पोस्ट शेअर करत रितेशसह संपूर्ण टीमचं भरभरून कौतुक केलं आहे. नुकतीच 'राजा शिवाजी' चित्रपटाबद्दल विवेक ओबेरॉयने खास पोस्ट लिहिली आहे. विवेक ओबेरॉय लिहितो, राजा शिवाजी' सिनेमाबद्दलची प्रत्येक गोष्ट थेट माझ्या मनाला येऊन भिडते. अर्थात, यासाठी मी आपल्या सर्वांचे भाऊ रितेशचं कौतुक करतो. पण, सिनेमाबद्दलची प्रत्येक गोष्ट मला इतकी भावतेय याचं महत्त्वाचं कारण म्हणजे, आपल्या सगळ्यांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल असलेला आदर! महाराजांच्या शौर्यगाथा ऐकत आपण मोठे झालो आहोत, आणि आता हा इतिहास आपल्याला पुन्हा अनुभवायला मिळणार आहे. रितेश भाऊयासाठी तुमचं खरंच खूप कौतुक. कारण विलासराव देशमुख यांच्यासारख्या महान नेत्याचा मुलगा म्हणून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान कार्याप्रती असलेली तुमची निष्ठाही वारसा आणि कर्तव्य यांचा सुंदर संगम आहे. रितेश यानिमित्ताने तुम्ही, तुमचे वडील विलासराव देशमुखांची महाराष्ट्राच्या मातीप्रती असलेली निष्ठा आणि भक्ती पुढे नेत आहात. या सिनेमातून तुम्हाला भव्य पडद्यावर पाहणं ही माझ्यासाठी सुद्धा सन्मानाची गोष्ट आहे. जिनिलीया यामध्ये महाराणी सईबाईंची भूमिका साकारणार आहे जिनिलीया तुम्ही सुद्धा या संपूर्ण प्रोजेक्टचा महत्त्वाचा भाग आहात; ज्यामुळे आताच्या काळात '७० मिमी'च्या पडद्यावर साकारलेलं हे स्वराज्याचं स्वप्न वास्तवात साकार झालं. 'राजा शिवाजी' सिनेमाच्या टीमला माझ्याकडून शुभेच्छा! असं विवेकने पोस्टमध्ये म्हटलं आहे.



# 'कॉकटेल २'मध्ये कृतिचा ग्लॅमरस यू - टर्न

बॉलिवूड अभिनेत्री कृति सेनन सध्या तिच्या आगामी 'कॉकटेल २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. २०१२ मधील हिट चित्रपट 'कॉकटेल'चा हा सिक्वेल असून या चित्रपटात कृति सेननसोबत शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटाची रिलीज डेट १९ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे. कृति सेननने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत या चित्रपटातील तिच्या भूमिकेबाबत काही खास खुलासे केले. तिने सांगितले की, 'कॉकटेल २'मधील तिचा रोल तिच्या आतापर्यंतच्या करिअरमधील सर्वात वेगळा आणि ग्लॅमरस आहे. प्रेक्षकांनी तिला अशा 'कूल' आणि स्टायलिश अंदाजात यापूर्वी कधीच पाहिले नाही. हा रोल तिच्यासाठी एक नवीन प्रयोग असून त्यात स्टाइल, आत्मविश्वास आणि ॲटिट्यूड यांचा खास संगम दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक होमी अदजानिया यांच्याबद्दल बोलताना कृतिने त्यांचे विशेष कौतुक केले. त्यांच्या वेगळ्या दृष्टीकोनामुळे तिच्यातील एक नवीन बाजू समोर आली, असे तिने सांगितले. माझ्यातील 'कूल साइड' मला स्वतःलाही माहिती नव्हती, पण दिग्दर्शकांनी ती खूप सुंदरपणे उभी केली, असे कृतिने नमूद केले. यापूर्वी कृति 'तेरे इश्क में' या चित्रपटात दिसली होती, ज्यामध्ये तिचा रोल खूप भावनिक आणि गंभीर होता. त्या भूमिकेबद्दल बोलताना तिने सांगितले की, तो अनुभव खूप थकवणारा होता. त्यामुळे त्यानंतर तिने काहीतरी हलकं-फुलकं आणि मनोरंजक काम करण्याचा निर्णय घेतला. याच कारणामुळे तिने 'कॉकटेल २'सारख्या ग्लॅमरस आणि एंटरटेनिंग चित्रपटाची निवड केली.

'कॉकटेल २'मध्ये ग्लॅमर, ड्रामा आणि नातेसंबंधांतील गुंतागुंत यांचा खास मिलाफ पाहायला मिळणार आहे. त्यामुळे हा चित्रपट २०२६ मधील बहुचर्चित आणि मोस्ट अवेटेड चित्रपटांपैकी एक मानला जात आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाचा फर्स्ट लुक टीजर अलीकडेच थिएटरमध्ये दाखवण्यात आला होता, मात्र तो अजून ऑनलाइन रिलीज करण्यात आलेला नाही. कृति सेननचा या चित्रपटातील 'हॉट' आणि स्टायलिश अवतार चाहत्यांसाठी पूर्णपणे नवा अनुभव ठरणार आहे. तिच्या या यू- टर्नमुळे प्रेक्षकांची उत्सुकता अधिकच वाढली आहे. एकूणच, 'कॉकटेल २' हा चित्रपट प्रेक्षकांना मनोरंजनाचा फुल डोस देणार असून कृतिचा नवीन अंदाज हा त्याचा मुख्य आकर्षण ठरणार आहे.





# गांगुलीच्या बायोपीकचं शूटिंग सुरू

बॉलिवूडमध्ये विविध खेळांवर तसंच खेळाडुंच्या आयुष्यावर आधारित चित्रपट आले आहेत. आजवर प्रदर्शित झालेल्या चित्रपटांपैकी बहुतांश चित्रपट प्रेक्षकांना आवडल्याचं दिसून आलं आहे. आता क्रिकेटचा 'दादा' सौरव गांगुलीचं आयुष्य आता मोठ्या पडद्यावर येणार आहे. या बायोपिकमध्ये बॉलिवूडचा अष्टपैलू अभिनेता राजकुमार राव मुख्य भूमिका साकारत आहे.

नुकतेच या चित्रपटाच्या शुटिंगला सुरुवात झाली आहे. राजकुमार रावने आपल्या इन्स्टाग्राम पोस्टद्वारे ही आनंदाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली. त्याने लिहिले, आणि सुरुवात झाली... एकमेव आणि अद्वितीय 'दादा'. या चित्रपटाची निर्मिती लव रंजन करत असून, 'उडान' फेम विक्रमादित्य मोटवाने या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. राजकुमारच्या बिझी शेड्युलमुळे या चित्रपटाचे प्रदर्शन २०२७ पर्यंत लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राजकुमार राव सध्या एकामागून एक तगड्या प्रोजेक्ट्समध्ये व्यस्त आहे. गांगुलीच्या बायोपीक व्यतिरिक्त तो प्रसिद्ध वकील उज्ज्वल निकम यांच्या जीवनावर आधारित 'निकम' या चित्रपटातही दिसणार आहे. तसेच, अभिनेत्री कीर्ती सुरेशसोबतचा त्याचा 'रफ्तार' हा चित्रपट २४ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# राम चरणचा 'पेड्डी'तील पहलवान लुक व्हायरल

दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण याच्या वाढदिवसानिमित्त चाहत्यांना खास भेट मिळाली आहे. त्याच्या आगामी पेड्डी या चित्रपटातून त्याचा पहलवान लुक समोर आला असून सोशल मीडियावर तो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. विशेष म्हणजे हा लुक पाहून अनेकांना दंगल आणि सुलतान या चित्रपटांची आठवण झाली आहे. राम नवमी आणि राम चरणचा वाढदिवस या दुहेरी निमित्ताने चित्रपटाच्या निर्मात्यांनी हा खास लुक रिलीज केला. या नव्या लुकमध्ये राम चरण एकदम वेगळ्या अवतारात दिसत आहे. तो 'पेड्डी पहलवान'च्या भूमिकेत असून क्रिकेटपटूपासून कुस्तीपटू होण्याचा त्याचा प्रवास दाखवण्यात आला आहे. त्यासाठी त्याने केलेलं बॉडी ट्रान्सफॉर्मेशन विशेष लक्षवेधी ठरत आहे. या लुकमध्ये राम चरणचा दमदार शरीरयष्टी, रफ अँड टफ अंदाज आणि गंभीर एक्स्प्रेशन पाहायला मिळतो. त्याचा हा लुक प्रेक्षकांना खूप आवडला असून चाहत्यांनी त्याला बर्थडे गिफ्ट असं म्हटलं आहे. 'आरआरआर'नंतर पुन्हा एकदा त्याने स्वतःला वेगळ्या पद्धतीने सादर केलं आहे. या चित्रपटामध्ये जान्हवी कपूर आणि राम चरण पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत. त्यामुळे या जोडीबद्दलही प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.

चित्रपटात शिवा राजकुमार, दिव्येंदु शर्मा आणि जगपति बाबू हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. 'पेड्डी' हा एक स्पोर्ट्स ड्रामा चित्रपट असून त्याचं दिग्दर्शन बुची बाबू यांनी केलं आहे. चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच प्रेक्षक त्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटातील 'चिकिरी चिकिरी' आणि 'राय राय रा रा' ही गाणीही आधीच खूप लोकप्रिय झाली असून त्यांना २०० मिलियनपेक्षा जास्त व्ह्यूज मिळाले आहेत.





# ऋषभ व रुक्मिणीच्या नात्यात मिठाच्या खडा?

'कांतारा अ लिजेंड चॅप्टर १' हा चित्रपट जगभरात गाजला. ऋषभ शेट्टी आणि रुक्मिणी वसंत यांची मुख्य भुमिका असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला होता. पण, आता ऋषभ शेट्टीने सोशल मीडियावर रुक्मिणी वसंत हिला अनफॉलो केलं आहे. रुक्मिणी वसंत हिच्यासोबतच ऋषभ शेट्टीनं मित्र राज बी. शेट्टीलाही अनफॉलो केले आहे. त्यांच्या नात्यात बिनसल्याच्या चर्चा आहेत. याच नेमकं कारण अद्याप समोर आलेलं नाही. पण, चित्रपटसृष्टीत आणि चाहत्यांमध्ये तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

ऋषभ शेट्टीच्या फॉलोअर्स लिस्टमध्ये रुक्मिणी वसंत आणि राज बी. शेट्टी या दोघांची नावं नसल्याने चाहत्यांच्या ही गोष्ट लक्षात आली .विशेष म्हणजे, ऋषभने 'होम्बले फिल्म्स' या प्रॉडक्शन हाऊसलाही अनफॉलो केले आहे, परंतु त्याने या संस्थेचे प्रमुख विजय किरागंदूर यांना मात्र अनफॉलो केलेले नाही. 'कांतारा: चॅप्टर १' मध्ये रुक्मिणी वसंतने 'राणी कनकवती' ही महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. चित्रपटाच्या यशानंतर दोघांमधील मैत्रीची सर्वत्र चर्चा होती. मात्र आता अचानक ऋषभने तिला सोशल मीडियावर का अनफॉलो, याचे ठोस कारण अद्याप समोर आलेले नाही. त्यांच्यात काही वैयक्तिक किंवा व्यावसायिक तणाव निर्माण झाला असावा, अशा चर्चा रंगू लागल्या आहेत. वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झाल्यास, ऋषभ शेट्टी 'कांतारा'च्या प्रीक्वेलनंतर आता लवकरच 'जय हनुमान' या बहुप्रतिक्षित चित्रपटात झळकणार आहे. तर रुक्मिणी वसंत ही प्रभाससोबत 'स्पिरिट' आणि यशसोबत 'टॉक्सिक' या चित्रपटात दिसणार आहे.



# कथानारचा बहुप्रतिक्षित ट्रेलर अखेर प्रदर्शित

'होम'च्या यशानंतर पाच वर्षांनी पुनरागमन करणारे राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक रोजिन थॉमस यांनी दिग्दर्शित केलेला आगामी चित्रपट म्हणजे कथानार होय. आणि याबाबत एक महत्वाची अपडेट आहे, तर यांचा आता बहुप्रतिक्षित ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटांची प्रेक्षक खुप दिवसांपासुन वाट पाहत होते. कारण हा चित्रपट, जागतिक स्तरावर एक भव्य सिनेमॅटिक अनुभव देणार आहे. तर सखोल संशोधन आणि बारकाव्यांवर बारकाईने लक्ष देऊन तयार केलेला हा ट्रेलर, एका दृश्यात्मक समृद्ध आणि आकर्षक कथेची झलक दाखवतो. कथानार या चित्रपटात जयसूर्या मुख्य भूमिकेत आहे. तसेच त्याला अनुष्का शेट्टी आणि प्रभू देवा यांच्यासह एका दमदार कलाकार समूहाची साथ लाभली आहे. जे महत्त्वाच्या भूमिका साकारत आहेत. विनीत, नितीश भारद्वाज, हरीश उथमन आणि कुलप्रीत यादव यांसारखे सहाय्यक कलाकार या चित्रपटाची बांधणी आणखी मजबूत करतात. 'कथानार'ला एक जागतिक चित्रपट म्हणून सादर केले जात आहे. तर हा चित्रपट हिंदी, मल्याळम, तमिळ, तेलगू, कन्नड, बंगाली आणि इंग्रजी यांसारख्या अनेक भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. कथानार हा चित्रपट श्री गोकुळम मुव्हीजच्या बॅनरखाली गोकुळम गोपालन यांनी निर्मित केला आहे. सर्वात मोठ्या भारतीय निर्मितींपैकी एक आहे. ज्यावर सुमारे ५०० तंत्रज्ञांनी पाच वर्षे काम केले आहे. विशेष म्हणजे, जयसूर्याने या प्रकल्पासाठी चार वर्षे समर्पित केली आहेत.

# ‘कप बशी’त दिसणार त्या दोघींची जुगलबंदी

सासू-सुनेचं नातं हे एव्हरग्रीन असतं. या नात्यामध्ये प्रेम, आदर, राग, रुसवे फुगवे अशा वेगवेगळ्या भाव-भावना असतात. याच नात्यातली एक वेगळी गोष्ट आता कप- बशी या आगामी चित्रपटात पाहता येणार आहे. वैभव चिंचाळकर दिग्दर्शित हा चित्रपट ५ जूनला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून, या चित्रपटाचं पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लाँच करण्यात आलं. अरूण आणि अरूणा हे दांपत्य त्यांच्या मुलाच्या लग्नासाठी मुलगी शोधत असतात. परंतु अरूणा यांच्या अध्यात्मिक गुरूनं सूनेबाबत काही अटी सांगितल्या आहेत. त्या अटींनुसार अरूणा मुलगी शोधत असतात. त्यांना तशीच मुलगी सापडते का? नक्की अशी कोणती अट आहे? त्यांचे पुढे लग्न जुळत की नाही? अशा धमाल आशयसूत्रावर कप बशी हा चित्रपट आधारित आहे. आताच्या आधुनिक काळातही पत्रिका पाहण्यासारख्या परंपरांवर भाष्य करत अत्यंत मनोरंजक पद्धतीने कथानक मांडण्यात आलं आहे. उत्तम अभिनेत्यांची फौज या चित्रपटात असल्यानं प्रेक्षकांना पुरेपूर मनोरंजन अनुभवायला मिळेल त्यासाठी ५ जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. सुकल्प चित्र या निर्मिती संस्थेने कप बशी या चित्रपटाची निर्मिती केली असून कल्पक सदानंद जोशी हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. तर बिग ब्रेन प्रॉडक्शन्सच्या निलेश राठी यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. चित्रपटाची पटकथा, संवाद चेतन सैंदाणे यांनी लिहिलेले आहे. चित्रपटात अभिनेत्री निर्मिती सावंत, पूजा सावंत अभिनेता ऋषी मनोहर, नयना आपटे, अनंत जोग, राहुल रानडे,आनंद इंगळे, चिन्मय शिंत्रे, पूर्णिमा तळवलकर, आनंद काळे अशी तगडी स्टारकास्ट असल्यामुळे उत्तम अभिनयाची मेजवानी या चित्रपटातून प्रेक्षकांना मिळणार आहे यात शंका नाही.गीतकार गुरु ठाकूर यांनी लिहिलेल्या गीतांना चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ संगीतकार उत्तम सिंग यांनी या चित्रपटाचं संगीत दिग्दर्शन लाभलं आहे. बाळू दहिफळे यांनी कॅमेरामन म्हणून काम पाहिले असून संकलन आशिष म्हात्रे यांचे आहे. नृत्य दिग्दर्शन दीपाली विचारे, कला दिग्दर्शन महेश कुडाळकर तर प्रोजेक्ट हेड म्हणून चिन्मय शिंत्रे यांनी काम पाहिले आहे.



## सोनालीने सांगितले फिटनेसचे रहस्य



अलीकडच्या काळात बॉलीवुडसह अनेक मराठी सेलिब्रिटी फिटनेस फ्रीक असल्याचे पाहायला मिळते. कलाकारांकडून त्यांच्या चाहत्यांनासुद्धा स्वत:च्या प्रकृतीची काळजी घेण्याचे आवाहन केले जाते. अनेक चाहत्यांना त्यांच्या आवडत्या कलाकारांच्या फिटनेस आणि एकूण दिनचर्येबद्दल जाणून घेण्यात रस असतो. कलाकारसुद्धा विविध माध्यमांतून याबद्दलच्या काही टिप्स किंवा सूचना देत असतात. अशातच मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने तिच्या फिटनेसबद्दल सांगितलं आहे. तसेच अभिनेत्रीची सकाळची सुरुवात कशी असते? ती कोणते पदार्थ खाते? याबद्दल तिने सांगितले. सोनाली कुलकर्णी गेली काही वर्षे इंटरमिटेंट फास्टिंगही करत आहे आणि याबद्दलही तिने नुकत्याच एका मुलाखतीत सांगितले आहे. एका मुलाखतीत सोनाली म्हणाली, माझं सकाळचं रुटीन हे त्या दिवसाच्या वेळापत्रकावर अवलंबून असतं. दिवसभर काही नसेल तर मी आरामात उठते. मला नैसर्गिकपणे जाग येते, तेव्हाच उठायला आवडतं. काही काम नसेल तर अगदी नऊ-दहा वाजता उठायलादेखील आवडतं. काम असेल तेव्हा पाच- सहा- सात अशा विचित्र वेळी उठावं लागतंच. तेव्हा काहीच करू शकत नाही. पण असं काही नसेल तर मला आरामात उठायला आवडतं. यापुढे ती म्हणाली मला ध्यानधारणा वगैरे जमत नाही. पण मी एक इअर इंजिनिअरींगचा कोर्स केला होता. मी आणि माझ्या नवऱ्याने मिळून ते केलं होतं. मी खूप आध्यात्मिक नाही किंवा खूप धार्मिकही नाही. पण मी agnortib विचारांची असल्याने एखाद्या गोष्टीचा अनुभव आला की, माझा विश्वास बसतो. मग तो विश्वास आणखी घट्ट होत जातो. त्यातूनच मी इअर इंजिनिअरींग केलं होतं. त्याचा मला खुप फायदा झाला. सकाळी कॉफी घ्यायच्या आधी मी अर्धा तास वगैरे ते करते. मग पुढे ब्लॅक कॉफीने माझ्या दिवसाची सुरुवात होते. यानंतर सोनाली म्हणाली, मी इंटरमिटेंट फास्टिंग करते. कमीतकमी १६ तास करते. पण कधीकधी प्रवास किंवा शूटिंगमुळे ते १८-१९ तास होतात. जे शक्यतो होऊ नये. पण मला या वेळात माझ्या शरीराला आराम द्यायला आवडतं. यादरम्यान जेवणातील प्रोटीन्सचा वगैरे मी जास्त विचार करत नाही. एखादा पदार्थ खाल्ला नाही तर मन दु:खी होतं. पण कशाला इतका त्रास का करून घ्यायचा? आपण फास्टिंग आणि व्यायाम करतच असतो, तर मग एखादा गोड पदार्थ खाल्ला आणि त्यामुळे मन तृप्त होत असेल तर स्वत:च्या शरीराला ते का देऊ नये. मी आठ तासांमध्ये शक्यतो काहीतरी पौष्टिक खाते. यात एखादी भाकरी वगैरेसुद्धा खाते. त्यानंतर मग फोन बघते. नंतर पुढे तासभर व्यायाम करते.

## पैसे बुडवणाऱ्यांवर भडकल्या गार्गी फुले



काम करूनही कलाकारांना मानधन न मिळण्याचे अनेक प्रसंग मराठी सिनेसृष्टीत घडताना दिसत आहेत. काही महिन्यांपूर्वीच शशांक केतकरने ही बाब समोर आणली होती. सोशल मीडियावरुन शशांकने दिग्दर्शक-निर्मात्याचं थेट नाव घेत अनेक वर्ष लोटूनही मानधन न मिळाल्याचं त्याने व्हिडीओत सांगितलं होतं. त्यानंतर आणखी काही कलाकारांनी त्यांचे प्रसंगही शेअर केले होते. आता अभिनेत्री गार्गी फुले यांनीदेखील यासंदर्भात सोशल मीडियावरुन एक पोस्ट शेअर करत संताप व्यक्त केला आहे. गार्गी फुलेंनी शेअर केलेल्या फेसबुक पोस्टमध्ये असं म्हटलं आहे की जगाला उपदेश देत जे फिकत असतात की धंदा कसा करावा, फिल्ममध्ये कसा पैसा आहे...पैसा नाही आणि काय केलं की फिल्म चालू शकेल विशेषत: मराठी...त्यांनी आधी केलेल्या कामांचे पैसे द्यावेत लोकांना...काम करणारे लोक भिकारी नाहीत. मेहनत करतात आणि त्याचा मोबदला असतो जो आधीच ठरलेला असतो. ही आता नुसती पोस्ट टाकतेय...यापुढे नावासकट लिस्ट टाकेन... ता.क. माझे कुठलेही पैसे बुडले नाहीत. पण माझ्या प्रियजनांचे अजून दिले नाहीत. तेव्हा कृपया मला फोन करून विचारू नये काय झालं म्हणून... गार्गी फुलेंचं मानधन किंवा कामाचे पैसे बुडालेले नाहीत. मात्र त्यांनी त्यांच्या मित्रपरिवारातील काही व्यक्तींसाठी ही पोस्ट शेअर केली आहे. गार्गी फुले या दिवंगत अभिनेते निळू फुले यांच्या मुलगी आहेत. गेल्या काही वर्षांपासून त्या मराठी कलाविश्वात कार्यरत आहेत. राजा राणीची गं जोडी, तुला पाहते रे, इंद्रायणी, सुंदरा या मालिकांमध्ये त्या महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसल्या. तर मसाला, हवाहवाई, नवरदेव बीएस्सी ॲग्री, कडीपत्ता, 'चिकटगुंडे' या सिनेमांमध्ये त्या झळकल्या आहेत. तर काही नाटकांमधूनही त्यांनी मनोरंजन केलं आहे.



# रामायण माहात्म्य

**साधारण ४० वर्षांपूर्वी चित्रपटसृष्टीतील दिग्गज निर्माता निर्देशक रामानंद सागर यांनी त्या काळी नवीनच सर्वश्रुत झालेल्या व देशभर घराघरांत पोहोचलेल्या दूरदर्शन या माध्यमाद्वारे 'रामायण' ही मालिका प्रस्तुत केली. ७८ भागात हे रामायण दर रविवारी सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत दाखविली जायची. सतत दीड वर्षे हा उपक्रम चालला. या काळात देशभरातील लोक आपले दैनंदिन व्यवहार आटोपून नव्हे, ॲडजस्ट करून रामायण पाहायचे. तत्कालीन रसिकांना त्याची आठवण आहेच. त्यासंबंधी एक सत्य प्रसंग सांगतो. माझ्या एका नातेवाईकाचे लग्न रामटेकला त्या काळात ठरले. लग्नाचा मुहूर्त रविवारी सकाळी ८.५५ चा काढला, तेव्हा घरातील एकाने म्हटले अरे ९ वाजता रामायण सुरू होते तेव्हा कोण येईल लग्नाला? झाले! आत्ता काय करावे? या विचारात सगळे होते. तेवढ्यात एकाने सुचविले, लग्नपत्रिकेत चक्क उल्लेख करावा की, लग्न आटोपल्यावर ताबडतोब दूरदर्शनवर 'रामायण' ही मालिका लग्न मंडपात दाखविली जाईल. झालेही तसेच. लग्नाला इतकी मंडळी आली की मंडप अपुरा पडला. दूरदर्शनचे दोन मोठे सेट मंडपात लावण्यात आले. बरोबर ८.५५ ला लग्न लागले. त्यानंतर वधू-वराला एका सोफ्यावर बसविण्यात आले आणि रामायणाला सुरुवात झाली. वधू- वरांसह सर्व वऱ्हाडी मंडळी रामायण पाहण्यात व्यग्र झाली.**

१९५८ रामायण संपल्यावर बाकीचे विवाहाचे विधी सुरू झाले. हे लग्न आणि ते रामायण ही आजही लक्षात आहे. आठवणीत आहे. ही मालिका अत्यंत लोकप्रिय झाली तसेच त्यात राम व सीतेची भूमिका करणारे कलाकार अरुण गोविल व दीपिका चिखलिया लोकांच्या श्रद्धेचे स्थान बनले. देशभरातील रसिकांच्या घराघरांत ते पोहोचले. नवदच्या दशकातील प्रेक्षकांच्या हृदयातस्थान निर्माण करणारे हे कलाकार नंतर विस्मृतीत गेलेत. परंतु, ३५ वर्षांनंतर 'कोरोना'च्या निमित्ताने देशभरात टाळेबंदी लागली. हा काळ सोसण्यास सुसह्य व्हावे म्हणून दिवसातून दोन वेळा परत एकदा रामायण दाखविण्यात दूरदर्शनने पुढाकार घेतला.

जुनी मालिका पुन्हा प्रसारित झाली. इतिहास पुनर्जीवित झाला. ज्या पिढीने केवळ रामायण माहात्म्य ऐकले होते. ज्येष्ठांच्या तोंडून किस्से ऐकले होते, त्या पिढीला कोरोना काळात हे सारे जुने ते सोने ठरल्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुभवता आले. ४० वर्षांपूर्वी रामायण सकाळी ९ ते १० या वेळेत सुरू असताना आणि रविवार असतानाही रस्ते निर्मनुष्य व्हायचे. लोक घरी बसून रविवारची सुट्टी एन्जॉय करायचे, तर कोरोना काळात रस्ते निर्मनुष्य व्हावे व लोकांनी घरीच बसावे हा जगण्याचा हेतू साध्य झाला. अरुण गोविल व दीपिका चिखलिया पुन्हा एकदा घराघरात पोहोचले. नवीन पिढीलाही या कलाकारांची अदाकारी अनुभवता आली. याच अनुषंगाने आठवले, जेव्हा दूरदर्शन नव्हते, चित्रपट माध्यम हे कृष्णधवल स्वरूपात होते, तांत्रिकदृष्ट्या अतिशय प्रतिगामी स्वरूप होते, त्या ४० ते ५० च्या दशकात अनेक धार्मिक चित्रपट प्रदर्शित व्हायचे. त्यावेळी प्रेम अदिब नावाचे एक देखणे कलाकार होते. त्यांनी २१ चित्रपटात रामाची भूमिका साकारली होती तसेच शाहू मोडक नावाच्या देखण्या कलाकाराने २९ चित्रपटात कृष्णाची भूमिका साकारली होती. १० ऑगस्ट १९१८ रोजी जन्मलेले प्रेम अदिब यांनी हिंदी चित्रपटात सर्वप्रथम श्रीरामाची भूमिका विजय भट्ट यांच्या 'भरत मिलाप' व 'रामराज्य' या चित्रपटात साकारली. 'रामराज्य'मधील तत्कालीन दिग्गज अभिनेत्री शोभना समर्थ (सीतेच्या भूमिकेत) बरोबर त्यांची जोडी देशभर रसिकांनी अक्षरशः डोक्यावर घेतली होती. त्यातील सरस्वती राणे यांनी गायलेले 'बिना मधुर मधुर कछु बोल' हे गाणे या चित्रपटाची ओळख ठरले. असे म्हणतात, त्या काळी राम व कृष्णाची जितकी कॅलेंडर किंवा पेंटिंग निघत त्यात रामाच्या ठिकाणी प्रेम अदिब व कृष्णाच्या ठिकाणी शाहू मोडक प्रकर्षाने असत. अरुण गोविल व दीपिका चिखलियासारखेच त्या काळी प्रेम अदिब व शाहू मोडक यांना राम- कृष्णाचा अवतार समजून लोक पाया पडत. त्यांच्या छायाचित्राची लोक अक्षरशः पूजा करीत. चित्रपट व दूरदर्शन माध्यमाचा हा महिमा! कलाकाराला देवत्वही प्राप्त कसे बहाल होते, याचे हे जिवंत उदाहरण आहे.

नागपूरचे सिद्धहस्त कवी राजाभाऊ बढे यांनी १९४३ सालच्या 'रामराज्य' या हिंदी व मराठी चित्रपटात आपल्या बहुश्रुत काव्याद्वारे रामायण माहात्म्य उद्धृत केले आहे. 'रामराज्य नांदले भूवरी अवतरला परमेश सुजल सुफल आसेतुहिमाचल अमुचा भारत देश' मराठी 'रामराज्य'मध्ये या गीताद्वारे त्यांनी मार्मिक शब्दात तत्कालीन धर्माचरणेनुसार वर्णन केले आहे. 'लाडक्या राणीला लागले डोहाळे पुरवा सोहळे रामराया आनंदी आनंद कोंदला मंदिरी सौभाग्य सुंदरी सीतामाई' सीतामाईचे डोहाळे लडीवाळ शब्दात. 'ग राणी मधुराणी का ओठ तुझे हसले कसले स्वप्न तुला पडले...' प्रणयाचा आविष्कार शृंगार रसात घोळून काव्य रचले. लक्ष्मण सीतेला वनवासात सोडून निघून जातो तेव्हा विव्हळ अवस्थेतील गीत. 'पाहिला न पुरेपणी श्रीरामचंद्र लोचनी एकदाच दावा कुणी थांब विहंगा परत नेई रे वाहूनी पंखावरी' लवकुशाचा जन्मोत्सव वाल्मीकि आश्रमात निसर्ग साजरा करतो, त्याचे वर्णन उत्कृष्ट काव्यात केले आहे. 'पावली मंगळाई, झालं मंगळ मंगळ रानाच्या तळ्यात आज उगविल्या आवळ्या जावळ्या कमळाच्या कळ्या नशिबाची वनदेवी सांगे शकून पिंगळ' लवांकुशाचा पाळणा त्या काळात गृहिणी प्रसंगी गायच्या. 'मी हिंदविते गाऊनिया लडीवाळा पाळणा लवांकुश बाळा' अशारीतीने सिनेमा या माध्यमाने रामायण माहात्म्य वेळोवेळी उद्धृत करून समाजप्रबोधनही साधले.

**रमेश पोफळी**

# निर्मिती सावंत यांनी अनासपुरेंकडे मागितली 'ही' मदत

मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री निर्मिती सावंत सध्या त्यांच्या 'सुपर डुपर' सिनेमामुळे चर्चेत आहेत. या चित्रपटात प्रेक्षकांना एकाच फ्लॅटमध्ये राहणार्‍या दोन कुटुंबांची गोष्ट पाहायला मिळेल. निर्मिती सावंत यांची संवादफेक आणि अस्सल गावाकडचा अंदाज प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरला आहे. 'सुपर डुपर' या चित्रपटात त्या गावातील एका खंबीर बाईची भूमिका साकारत आहेत. घर सांभाळणारी, परिस्थितीशी झुंज देणारी आणि कुटुंबाच्या अस्तित्वासाठी उभी राहाणारी स्त्री. विशेष म्हणजे, या भूमिकेला अधिक वास्तववादी बनवण्यासाठी निर्मिती सावंत यांनी खास मेहनत घेतली आहे. ग्रामीण भाषेचा नेम का फ्लेवर, रांगडेपणा आणि बोलीभाषेतील बारकावे अचूक साधण्यासाठी त्यांनी प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांची मदत घेतली. त्यांनी स्क्रिप्ट पाठवून त्यांच्याकडून भाषेतील शब्द, वाक्प्रचार आणि लहेजा समजून घेतला, ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखेला खरेपणाची जोड मिळाली. याबद्दल निर्मिती सावंत म्हणतात, चित्रपटात मी एका गावाकडच्या बाईची भूमिका साकारतेय. तिचं आयुष्य, तिचं जगणं हे खूप वास्तव आहे. भाषेचा अचूकपणा आणण्यासाठी मी मकरंद



अनासपुरेशी संपर्क साधला. अर्थात दिग्दर्शकाच्या परवानगीने मकरंद त्याच भागातला असल्यामुळे, त्याच्या मार्गदर्शनामुळे त्या बोलीचा रांगडेपणा आणि नैसर्गिकपणा मला समजला. तिथले काही शब्द कसे वापरले जातात, हे कळलं. त्यामुळे ही भूमिका अधिक खरी वाटते. अशीच जर मी ती भूमिका साकारली असती तर ती प्रेक्षकांना अन्य भूमिकांसारखीच वाटली असती, मात्र आता ती प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल, असं मला वाटतं. चित्रपट निवडण्याबाबतही निर्मिती सावंत अत्यंत विचारपूर्वक निर्णय घेतात. स्क्रिप्ट वाचताना त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात आणि त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळाल्यानंतरच त्या भूमिका स्वीकारतात. प्रॉडक्शन हाऊस, दिग्दर्शक, लेखक, डीओपी अशा सर्व गोष्टींचा बारकाईने विचार करूनच त्या चित्रपटाची निवड करतात. नव्या कलाकारांमध्येही 'स्पार्क' दिसला, तर त्यांच्यासोबत काम करण्यास त्या नेहमी तयार असतात. 'सुपर डुपर' सिनेमा ३ एप्रिलला प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. यामध्ये निर्मिती सावंत यांच्यासह विदुला चौगुले, ललित प्रभाकर, शशांक शेंडे, हृषिकेश जोशी, कुशल बद्रिके, नम्रता संभेराव, प्रतीक्षा कोते यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.



# 'ही' लोकप्रिय गायिकाही पार्श्वगायनातून निवृत्ती घेणार?

प्रसिद्ध बॉलीवूड गायक अरिजीत सिंगने नुकतीच पार्श्वगायनातून निवृत्ती जाहीर केली. त्याचा हा निर्णय त्याच्या चाहत्यांसाठी साहजिकच धक्कादायक आहे. आपल्या सुमधुर गायनासाठी ओळखला जाणारा अरिजीत हा संगीतसृष्टीतील सर्वांत लोकप्रिय गायक आहे. त्यामुळे त्याने पार्श्वगायनातून निवृत्ती घेतल्यानंतर असंख्य चाहत्यांनी नाराजी व्यक्त केली होती. अरिजीतनंतर आता आणखी एका लोकप्रिय गायिकेनेसुद्धा निवृत्तीबद्दलच्या निर्णयाचे संकेत दिले आहेत. श्रेयाने एका मुलाखतीत सांगितले की, स्टेजवर लाइव्ह गाण्याऐवजी लिप-सिंक करून गाणं सादर करणं तिला अजिबात मान्य नाही. जर भविष्यात असं करण्याची वेळ तिच्यावर कधी आली, तर ती गाणंच बंद करील. श्रेयाने, लाइव्ह परफॉर्म करणं हे गायकासाठी खूप महत्त्वाचं आहे, असे सांगितले. तसेच यावेळी श्रेयाने अरिजीतच्या निर्णयावरसुद्धा प्रतिक्रिया दिली. श्रेया म्हणाली, स्टेजवर गाणे गाण्यासाठी लिप-सिंक करणे ही गोष्ट मला खूप विचित्र वाटते. ज्या दिवशी मला असे करावे लागेल, त्या दिवशी मी गायन बंद करीन. त्यामुळे जोपर्यंत माझा आवाज व्यवस्थित आहे आणि माझा रोज गाण्याचा सराव सुरू आहे. तोपर्यंत मला स्टेजवर उभे राहून रसिक श्रोत्यांसाठी लाइव्ह गाणे गायला नेहमीच आवडेल. पण जेव्हा हे होणार नाही, तेव्हा मी गाणं बंद करेन. तसेच यावेळी तिने लाइव्ह परफॉर्म करताना गायक म्हणून एक मोठी जबाबदारी असल्याचेसुद्धा यावेळी नमूद केले. त्याबद्दल श्रेया म्हणाली, कलाकार म्हणून आपल्या वैयक्तिक आयुष्यात काहीही सुरू असले तरी त्याचा परिणाम स्टेजवर दिसता कामा नये. संगीत हे त्यांना त्यांच्या दुःखातून आणि समस्यांतून बाहेर पडण्यास मदत करते. रसिकांकडून मिळणारे प्रेमच आम्हाला पुन्हा पुन्हा परफॉर्म करण्याची प्रेरणा देते. पुढे गायिकेने अरिजीत सिंगने घेतलेल्या निर्णयाबद्दल स्वत:चे मत व्यक्त केले, असा निर्णय घेण्यासाठी खूप धाडस लागते आणि ती त्याच्या निर्णयाचा आदर करत असल्याचेसुद्धा तिने सांगितले. दरम्यान, श्रेया घोषाल हे संगीतविश्वातले मोठे नाव आहे. मराठी, हिंदीसह तिने अनेक भाषांतली गाणी गायली आहेत. त्यामुळे जवळपास प्रत्येक भाषेत तिचा चाहतावर्ग आहे. गायिका असण्याबरोबरच श्रेया अनेक रिॲलिटी शोमधून परीक्षकाचे कामदेखील करते.




# 'छावा'चा सिक्वेल येणार?

बॉलिवूड अभिनेता विकी कौशलच्या 'छावा' चित्रपटाला मोठी पसंती मिळाली. लक्ष्मण उतेकर यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला हा सिनेमा विकी कौशलच्या करिअरमधील टर्निंग पॉइंट ठरला.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनगाथेवर आधारित असणारा हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर हिट ठरला. २०२५ मधील सर्वांत मोठ्या हिट चित्रपटांपैकी एक ठरलेल्या 'छावा'च्या ऐतिहासिक यशानंतर ही जोडी पुन्हा एकदा इतिहास घडवण्यासाठी एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. एका वृत्तानुसार, 'छावा'च्या पहिल्या भागात छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा प्रेक्षकांनी अनुभवल्यानंतर आता दुसर्‍या भागात संभाजी महाराजांचे पुत्र छत्रपती शाहू महाराज यांचा जीवनप्रवास मांडला जाणार आहे.

संभाजी महाराजांची भूमिका अजरामर केल्यानंतर आता विकी कौशल स्वतः शाहू महाराजांच्या भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे. पुढील वर्षी किंवा २०२८ च्या सुरुवातीला सिनेमाचं शुटिंग सुरू होऊ शकतं. मात्र, या नव्या बायोपिकबाबत विकी किंवा उतेकर यांच्याकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

दरम्यान, लक्ष्मण उतेकर 'ईथा' या सिनेमाच्या दिग्दर्शनात व्यस्त असून, यात श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत आहे. हा सिनेमा पूर्ण केल्यानंतरच ते शाहू महाराजांच्या कथेला सुरुवात करणार आहे. दुसरीकडे, विकी कौशल देखील सध्या संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या सिनेमाचं शुटिंग करत आहे. त्यानंतर तो भगवान परशुरामांवर आधारित 'महावतार' या मोठ्या प्रोजेक्टसाठी तयारी करणार आहेत.

# 'मातृभूमी'च्या रिलीजआधी सलमानची घोषणा



बॉलीवूडचा भाईजान म्हणजेच अभिनेता सलमान खानच्या नवीन चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पहात आहेत. गेल्या काही दिवसांपासून त्याच्या मातृभूमी या सिनेमाची चर्चा होत आहे. आधी या सिनेमाचे नाव 'बॅटल ऑफ गलवान' असे होते, त्यानंतर चित्रपटाच्या नावात बदल केला गेला आणि 'मातृभूमी' हे नवीन नाव ठेवलं गेलं. आता सलमान खान पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. याचे कारण म्हणजे त्याने नवीन सिनेमाची घोषणा केली आहे. आता हा सिनेमा कोणता, त्याच्याबरोबर या सिनेमात आणखी कोणते कलाकार दिसणार, तसेच हा सिनेमा कधी प्रदर्शित होणार, या सगळ्याबद्दल जाणून घेऊ. सलमान खानने नुकतीच त्याच्या एक्स अकाउंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्याने त्याच्या नवीन चित्रपटात कोणाबरोबर काम करणार आहे याबद्दल लिहिले आहे. वामसी पैदीपल्ली हा चित्रपट दिग्दर्शित करणार असून दिल राजू चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. त्याने दिग्दर्शनक वामसी पैदीपल्ली यांच्याबरोबर फोटो शेअर करत लिहिले, एप्रिलपासून वामसी पैदीपल्ली आणि दिल राजू यांच्याबरोबर. श्री व्यंकेटश्वरा प्रोडक्शनने एक्स अकाउंटवर चित्रपटाबद्दल अधिक माहिती शेअर केली आहे. या प्रोजेक्टबद्दल लिहिताना सलमानचेदेखील त्यांनी कौतुक केले. त्यांनी लिहिले, सलमान खान अशी व्यक्ती आहे, ज्यांनी असे क्षण जगभरातील प्रेक्षकांना दिले, जे प्रेक्षक साजरे करू शकले. आता ते आमचे प्रिय ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे दिग्दर्शक वामशी पेदिपल्ली यांच्याबरोबर हातमिळवणी करणार आहेत. वामसी पैदीपल्ली यांच्या कामाबद्दल बोलायचे तर त्यांनी 'मुन्ना' या चित्रपटातून दिग्दर्शनात पहिले पाऊल ठेवले. या सिनेमात अभिनेता प्रभास प्रमुख भूमिकेत दिसला होता, त्यानंतर त्यांनी दिग्दर्शित केलेले अनेक सिनेमे गाजले, त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली. ज्युनिअर एनटीआरची प्रमुख भूमिका असलेला 'बृंदावनम', राम चरणची भूमिका असलेला 'येवडु' असे त्यांचे अनेक चित्रपट गाजले. 'महर्षि' सिनेमासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. तसेच, तमिळ सुपरस्टार विजयची प्रमुख भूमिका असलेला 'वरिसु' या सिनेमाचेदेखील त्यांनी दिग्दर्शन केले आहे. आता सलमानची प्रमुख भूमिका असलेल्या सिनेमाची निर्मिती दिल राजू श्री व्यंकेटश्वरा प्रोडक्शन हाऊस करणार आहे. दिल राजू यांनी आजपर्यंत ६० सिनेमांचे दिग्दर्शन केले आहे. तसेच, दोन चित्रपटांसाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. निर्माते आणि दिग्दर्शक या नवीन सिनेमाच्या निमित्ताने पहिल्यांदाच सलमानबरोबर काम करणार आहेत. वामसी पैदीपल्ली आणि दिल राजू यांनी पाच चित्रपटांत एकत्र काम केले आहे. आता सलमानच्या नवीन चित्रपटाचे नाव काय असणार, हा चित्रपट कधी प्रदर्शित होणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# 'राजी'च्या रीमेकची चर्चा जोरात

बॉलिवूडमधील गाजलेला 'राजी' हा चित्रपट पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या चित्रपटाच्या रीमेकबाबत सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, या वेळी मुख्य भूमिकेत आलिया भट्ट ऐवजी यामी गौतम दिसू शकतात, अशी चर्चा रंगली आहे. 'राजी' हा चित्रपट लेखक हरिंदर सिक्का यांच्या 'कॉलिंग सहमत' या कथेवर आधारित होता. सोशल मीडियावर एका युजरने सिक्का यांना 'राजी'च्या रीमेकबद्दल प्रश्न विचारला. त्यावर त्या युजरने यामी गौतमला मुख्य भूमिकेत घेण्याचा सल्ला दिला. तसेच मूळ कथा कोणतेही बदल न करता पुन्हा दाखवावी, असेही त्याने म्हटले. या प्रश्नावर हरिंदर सिक्का यांनी उत्तर देताना सांगितले की, त्यांना पैशांची गरज नाही, पण त्यांनी यामी गौतमच्या अभिनयाचे खूप कौतुक केले. त्यांनी तिला उत्कृष्ट अभिनेत्री म्हटले आणि तिचे सर्वोत्तम काम अजून यायचे आहे, असेही संकेत दिले. त्यामुळे यामी 'सहमत'च्या भूमिकेत दिसणार का, याबाबत उत्सुकता आहे. दरम्यान, एका युजरने विचारले की 'राजी'चा रीमेक खरोखरच बनणार आहे का, तेव्हा सिक्का यांनी फक्त नो कमेंट असे उत्तर दिले. या सगळ्या चर्चेमध्ये आणखी एक महत्त्वाची गोष्ट समोर आली. हरिंदर सिक्का यांनी 'राजी' चित्रपटाच्या दिग्दर्शिका मेघना गुलजार यांच्यावर नाराजी व्यक्त केली. त्यांनी म्हटले की, त्यांना दिग्दर्शक म्हणून मेघना गुलजार यांची निवड करणे ही त्यांची सर्वात मोठी चूक होती. काही लोकांनी आधीच त्यांना सावध केले होते, पण त्यांनी ते गांभीर्याने घेतले नाही. त्यांच्या मते, चित्रपटात मूळ कथेतील भावना दाखवली गेली नाही. तरीही, या वादानंतरही 'राजी' चित्रपट बॉक्स ऑफिसवर मोठा हिट ठरला होता. या चित्रपटात आलिया भट्टसोबत विक्की कौशल आणि जयदीप अहलावत यांच्याही भूमिका होत्या. सध्या 'राजी'च्या रीमेकबाबत कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नसली, तरी हरिंदर सिक्का यांच्या वक्तव्यामुळे या चर्चेला वेग आला आहे. यामी गौतम खरंच या भूमिकेत दिसणार का, आणि हा रीमेक प्रत्यक्षात साकार होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.





# रणबीरनं 'रामायण'साठी दिला होता नकार

रणबीर कपूर सध्या त्याच्या 'रामायण'मधील भूमिकेमुळे चर्चेत आहे. या बहुप्रतिक्षित चित्रपटाची झलक आता समोर आली आहे. यामध्ये रणबीर प्रभू श्रीरामांच्या भूमिकेत पाहायला मिळतोय. अभिनेता श्रीरामांच्या भूमिकेत अगदी रुबाबदार दिसत आहे. त्यामुळे सध्या सोशल मीडियावर सर्वत्र त्याची चर्चा सुरू आहे. अशातच आता त्याची बायको अभिनेत्री आलिया भट्टनंही त्याचं कौतुक केलं आहे. नितिश तिवारी दिग्दर्शित आणि नमित मल्होत्रा निर्मित 'रामायण' चित्रपटाचा टीझर हनुमान जयंतीचं औचित्य साधून २ एप्रिल रोजी रिलीज होणार असल्याची माहिती निर्मात्यांनी आधीच दिली होती. आता अखेर हा टीझर रिलीज झाला आहे. अशातच आलियानं नवरा रणबीरच्या 'रामायण' चित्रपटाचा टीझर सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये रणबीर श्रीरामांच्या भूमिकेत दिसत आहे. टीझर शेअर करण्यापूर्वी आलियानं नवरा रणबीरचं 'रामायण'मधील कामासाठी कौतुकही केलं होतं. सोशल मीडिया मार्फत चाहत्यांशी संवाद साधताना रणबीरनं 'रामायण'मध्ये खूप चांगलं काम केलं आहे. असं म्हटलं होतं. वृत्तानुसार आलिया म्हणाली, रामायणचा टीझर रिलीज होणार आहे. मी माझ्या सोशल मीडिया अकाउंटवरुन तो पोस्ट करणार आहे. त्यामुळे कृपया चित्रपट बघायला जा आणि तुमचा पाठिंबा द्या. अभिनेत्रीनं पुढे रणबीरच्या कामाचं कौतुकही केलं. ती म्हणालेली, त्यानं खूप उत्तम काम केलं आहे आणि तुम्ही सगळ्यांनी हा चित्रपट पाहावा यासाठी मी खूप उत्सुक आहे. खूपच जगावेगळी गोष्ट आहे ही. आलियानं रणबीरचं कौतुक केल्यानंतर आणि सोशल मीडियावर त्याच्या 'रामायण' चित्रपटाचा टीझर शेअर केल्यानंतर नेटकरी सोशल मीडियावर तिनं तिच्या नवर्‍याला पाठिंबा दिल्यामुळे कौतुक करत आहेत. दरम्यान, भारतात 'रामायण'चा टीझर रिलीज होण्याआधी न्यू यॉर्कमध्ये नुकताच चित्रपटाचा टीझर रिलीज झाला होता. त्यावेळी न्यू यॉर्क स्पेशल IM-द ट्रेलर स्क्रीनींगमध्ये रणबीर कपूरसुद्धा 'रामायण'मधील त्याच्या भूमिकेबद्दल बोलला होता. अभिनेता म्हणालेला, मला आठवतंय जेव्हा काही वर्षांपूर्वी नमितनं मला प्रभू रामांच्या भूमिकेसाठी विचारलं होतं. तेव्हा मी नाही म्हटलेलं. मी सांगितलेलं की मी त्यासाठी योग्य व्यक्ती नाहीये. मला असं वाटलेलं की जर मला या भूमिकेला न्याय देता आला नाही तर. पण, ती भीती क्षणार्धात दूर झाली कारण अशी संधी फार मिळत नाही आणि याच संधीची मला गरज होती.

# भूमी भूमिकांपेक्षा फिटनेसला देणार प्राधान्य



मधुबाला बॉलिवूड अभिनेत्री भूमी पेडणेकर सध्या तिच्या फिटनेस आणि बदललेल्या विचारसरणीमुळे चर्चेत आहे. अलीकडेच इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२६ दरम्यान तिने आपल्या करिअर आणि आरोग्याबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला. विशेष म्हणजे, आता ती चित्रपटांतील भूमिकांपेक्षा स्वतःच्या शरीराला आणि तब्येतीला अधिक महत्त्व देत असल्याचे तिने स्पष्ट केले आहे. भूमी पेडणेकरने तिच्या करिअरची सुरुवात यशराज फिल्म्समध्ये कास्टिंग असिस्टंट म्हणून केली होती. त्यानंतर २०१५ मध्ये 'दम लगा के हईशा' या चित्रपटातून तिने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. या चित्रपटासाठी तिने मुद्दाम वजन वाढवले होते, आणि त्यानंतर अनेक भूमिकांसाठी तिला वारंवार वजन कमी- जास्त करावे लागले. तिच्या अभिनयाचे प्रेक्षकांनी नेहमीच कौतुक केले, पण या सगळ्या प्रक्रियेचा तिच्या शरीरावर परिणाम होत गेला.

एका मुलाखतीत भूमीने सांगितले की, खरा कलाकार तोच असतो जो स्वतःच्या कलेशी प्रामाणिक राहतो. पण त्याचबरोबर आपल्या शरीराचीही काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. ती म्हणाली की, सतत वजन वाढवणे आणि कमी करणे ही प्रक्रिया शरीरासाठी खूप कठीण असते. त्यामुळे आता ती या गोष्टीबाबत अधिक सावध झाली आहे. भूमीच्या मते, वय वाढत जात असताना शरीराची काळजी घेणे अधिक आवश्यक होते. विशेषतः महिलांनी एका टप्प्यानंतर आपल्या आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे. यामुळेच तिने आता आपल्या कामाच्या निवडीमध्येही बदल केला आहे. ती केवळ भूमिकांसाठी शरीरावर ताण देण्याऐवजी संतुलित आणि आरोग्यदायी जीवनशैलीवर भर देत आहे. वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, भूमी नुकतीच 'मेरे हसबैंड की बीवी' या चित्रपटात झळकली होती. या चित्रपटात तिच्यासोबत अर्जुन कपूर आणि रकुल प्रीत सिंह होते. तसेच ती नेटफ्लिक्सवरील 'द रॉयल्स' या मालिकेतही दिसली, जिथे तिने ईशान खट्टर सोबत स्क्रीन शेअर केली. २०२६ मध्ये 'दलदल' या चित्रपटातही ती एका पोलिस अधिकार्‍याच्या भूमिकेत दिसली. भूमी पेडणेकरचा हा बदललेला दृष्टिकोन अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. ग्लॅमर इंडस्ट्रीमध्ये टिकून राहण्यासाठी शरीरावर ताण देण्यापेक्षा, स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे, याचा संदेश ती देत आहे.रिप्लेस केलं होतं. वृत्तानुसार, कियारा अडवाणी सुरुवातीला शक्ती शालिनी मध्ये काम करणार होती, परंतु तिच्या व्यस्त वेळापत्रकामुळे तिने या प्रोजेक्टमधून माघार घेतली. त्यानंतर अनित पड्डाला त्या भूमिकेसाठी कास्ट करण्याल आलं.